


अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । सोमवार, दि. ६ ऑक्टोबर २०२५ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : ९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## उक्कडगाव येथे घरात असताना चोरी

**बार्शी :** घरात झोपले असताना चोरट्याने बंद खोलीचा दरवाजा उघडून कपाटातील १९ ग्रॅम सोन्याचे दागिने पळवले. ही चोरी उक्कडगाव (ता.बार्शी) येथे शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली. यासंदर्भात रवींद्र मन्मथ मुळे (रा. उक्कडगाव) यांनी पांगरी पोलिसात फिर्याद दाखल केली. ते शुक्रवारी रात्री शेतात गेले होते. त्यावेळी घरात महिला झोपल्या होत्या. पहाटे तीन वाजेच्या सुमारास आवाज आल्याने महिला जागे झाल्या. तेव्हा त्यांना चोरी झाल्याचे दिसून आले.चोरट्याने दुसऱ्या खोलीतील लोखंडी कपाट उघडून त्यातील सोन्याचे दागिने चोरून नेल्याचे आढळले. चोरीस गेलेल्या दागिन्याची किंमत ५७ हजार रुपये इतकी असल्याची नोंद पोलिसात झाली. हवालदार दळवी पुढील तपास करीत आहेत.

# पोटच्या गोळ्याला वाचवताना वडिलांचा नदीत बुडून मृत्यू
# बार्शीच्या नागझरी नदीमधील थरार, मुलाची मृत्यूशी झुंज

## वडील ख्रिश्चन धर्मगुरू, जुळे सोलापूरच्या कल्याणनगरवर शोककळा

बार्शी/प्रतिनिधी

**बार्शी तालुक्यातील धामणगाव दुमाला येथे अतिवृष्टीमुळे वाहणाऱ्या नागझरी नदीने आणखी एक बळी घेतला आहे. पुराचे पाणी पाहण्यासाठी गेलेल्या ख्रिश्चन धर्मगुरू अरुण उर्फ डेव्हिड सतीश बनसोडे (वय ४२, रा. सोलापूर, कल्याणनगर) यांनी आपल्या मुलाला वाचविताना दुर्दैवीरीत्या प्राण गमावले. ही दुर्दैवी घटना रविवारी घडली.**

सोलापूरमधील ख्रिश्चन धर्मगुरू डेव्हिड हे पत्नी व तीन मुलांसह आपल्या मूळ गावी आले होते. गावाजवळून प्रचंड वेगाने वाहणाऱ्या नागझरी नदीचा उधाणलेला रौद्ररूप पाहण्यासाठी ते पत्नी व मुलांसह बंधाऱ्यावर गेले. तेथे उभे असताना त्यांचा


मृत अरुण बनसोडे

मुलगा अनुग्रह डेव्हिड बनसोडे (वय ११) याचा पाय घसरला आणि तो थेट पुराच्या पाण्यात पडला. आपल्या लेकराला वाचवण्यासाठी डेव्हिड यांनी क्षणाचाही विलंब न करता नदीत उडी घेतली. त्यांनी मुलाला वर ढकलून किनाऱ्याकडे ढकलले, मात्र स्वतः मात्र प्रचंड प्रवाहाच्या लाटांमध्ये अडकून गटांगळ्या खात वाहून गेले.

### गावकऱ्यांचा शूर प्रयत्न
हा थरार पाहून पत्नीने आरडाओरड केल्यावर गावकरी व पोलीस पाटील गणेश पाटील धुमाळ घटनास्थळी धावून आले. त्यांनी नदीतून डेव्हिड आणि त्यांचा मुलगा यांना बाहेर काढले आणि तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र तोपर्यंत डेव्हिड यांनी प्राण सोडले होते. मुलगा अनुरोध याला पुढील उपचारासाठी अश्विनी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती गंभीर आहे.

### शोककळा पसरली
आपला मुलगा वाचविताना प्राण गमावणारे डेव्हिड हे सोलापूरमधील ख्रिश्चन समाजामध्ये धर्मगुरू म्हणून कार्यरत होते. त्यांच्या अकाली निधनामुळे सोलापूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्यावर सोलापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### जनजागृतीचा धडा
या घटनेमुळे एक गोष्ट अधोरेखित झाली - पुराचा प्रकोप पाहण्यासाठी अनेक जण जिज्ञासेपोटी धोकादायक ठिकाणी जातात, मात्र यामागे जीवावर बेतणारे परिणाम घडतात. नदी-नाले रौद्ररूप धारण केल्यावर त्यापासून लांब राहणेच सुरक्षित आहे, अशी चर्चा गावोगावी सुरू आहे.

# ठाकरे बंधूंची तीन महिन्यात पाचवी 'गळाभेट'

## राजकीय पंडितांचे डोळे विस्फारले
## बारशाचा कार्यक्रम आटोपून राज थेट 'मातोश्री'वर गेले



**मुंबई : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीविषयी गेल्या अनेक दिवसांपासून राज्याच्या राजकारणात मोठी उत्सुकता होती.हा प्रसंग अखेर रविवारी सत्यात उतरला. एक कार्यक्रम आटोपून राज हे चक्क मातोश्रीवर उद्धव यांची भेट घेतली. त्यामुळे राजकीय विश्लेषकांचेही डोळे विस्फारले आहेत. या प्रसंगाला खूप कंगोरे आहेत. त्यामुळेही मुंबई महापालिकेसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची मानली जात आहे.पडद्याआड दोन भावांमध्ये काही तरी शिजतेय,अशी शंकाही व्यक्त केली जात आहे.**

### पडद्यामागे काहीतरी मोठे घडतेय?
आगामी काळात मुंबई महापालिकेची निवडणूक आहे. तर दुसरीकडे ठाकरे बंधूंमध्ये जवळीक वाढताना दिसत आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक प्रतिष्ठेची असणार आहे. उद्धव ठाकरे यांच्याकडून मुंबई महापालिका हिसकावण्यासाठी भाजप जंग जंग पछाडणार आहे. त्यासाठी भाजपला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची साथ मिळणार आहे. तसेच भाजप मनसेलादेखील हाताशी घेण्यासाठी प्रयत्न करत आहे. पण ठाकरे बंधू या निवडणुकीत एकत्र लढले तर निकाल वेगळा लागू शकतो. यामुळे दोन्ही भाऊ एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण येत आहे. ठाकरे बंधूंनी एकत्र यावेत, यासाठीच पडद्यामागे हायव्होल्टेज घडामोडी घडत आहेत का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

**५ वेळा एकत्र :** राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी याआधी युती संदर्भात दोन्ही नेत्यांची प्राथमिक चर्चा झाल्याची माहिती होती, त्यानंतर पुन्हा एकदा आता राज ठाकरे मातोश्रीवर आल्याने शिवसेना-मनसेच्या युतीची चर्चा होत आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे गेल्या ३ महिन्यात ठाकरे बंधू ५ वेळा एकत्र आले आहेत. मुंबईतील वांद्रे एमसीएममध्ये संजय राऊत यांच्या नातीचा बारशाचा कार्यक्रम होता. त्यासाठी, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले होते. या कार्यक्रमात दोन्ही नेत्यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या.

**रश्मी आणि राज यांनी निरोध धाडला :** राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्रितपणे कार्यक्रमातून बाहेर पडले. त्यावेळी स्वतः रश्मी ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी राज ठाकरेंना निरोप दिला. रश्मी ठाकरे, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी बाहेर आल्यानंतर एकमेकांना हस्तांदोलन केले होते. त्यामुळे, कौटुंबीक कार्यक्रमातील भेटीमुळे वातावरण देखील हलकेफुलके होते. मात्र, या भेटीनंतर राज ठाकरे शिवतीर्थ बंगल्यावर न जाता थेट मातोश्रीवर गेल्याने पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राऊत यांच्या नातवाच्या नामकरण सोहळ्याला एकत्र ठाकरे सहकुटुंब पाहायला मिळाले.

राज्यात सर्वच पक्षांमध्ये निवडणुकीच्या अनुषंगाने एकीकडे घडामोडी सुरु असताना राज हे पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानी गेले. खासदार संजय राऊत यांच्या नातवाच्या बारसाच्या कार्यक्रमाला ठाकरे बंधूंनी हजेरी लावली. यानंतर राज हे उद्धव ठाकरे यांच्या घरी गेले. दोन्ही भावांमध्ये जवळपास अर्धा तास भेट झाल्याची माहिती आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्याच्या घडीला मोठी पोकळी निर्माण झाली आहे. सध्या भाजपला चॅलेंज करतील असे पक्ष आहेत. पण तरीही विरोधकांमध्ये एक मोठी पोकळी निर्माण झालेली बघायला मिळते. या काळात ही पोकळी दोन ठाकरे भाऊ एकत्र आले तर भरुन निघण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत याबाबतचा मोठा प्रयोग होण्याची शक्यता आहे. हा प्रयोग यशस्वी ठरला तर महाराष्ट्राचे राजकीय समीकरणांमध्ये अमूलाग्र असा बदल घडण्याची शक्यता आहे. ही राजकीय युती खरी ठरली तर महाराष्ट्राचे राजकारण ३६० डिग्रीने बदलू देखील शकणार आहे. तसेच महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघण्याची दाट शक्यता आहे.

या सर्वात मोठ्या राजकीय समीकरणासाठी पडद्यामागे मोठ्या हालचाली घडताना दिसत आहे. राज्यात काही दिवसांपूर्वी शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषेच्या सक्तीविरोधात मोठे रान पेटले होते. मराठी भाषेच्या मुद्द्यावरुन १८ वर्षांनी पहिल्यांदाच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे विचार जुळून आले. हे विचार इतके जुळले की, दोन्ही ठाकरे बंधूंचा एकत्रित मेळावा पार पडला. या मेळाव्यात महायुतीच्या सरकारला मोठा इशारा देण्यात आला.

ठाकरे बंधूंच्या मेळाव्यानंतर दररोज दोन्ही पक्षांमध्ये हालचाली वाढताना दिसत आहेत. दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. दोन्ही पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये बैठका होत आहेत.

राज ठाकरे काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या मातोश्री निवासस्थानी गेले होते. दोन्ही भावांच्या भेटीचा फोटो समोर आला होता. या भेटीनंतर राज ठाकरे यांच्या निवासस्थानी उद्धव ठाकरे यांनी कुटुंबासह भेट दिली होती. जवळपास १८ वर्षांनी उद्धव ठाकरे गणेशोत्सवाच्या निमित्ताने राज ठाकरे यांच्या घरी गेले होते.


# सेंट्रींगच्या कामात विजेचा शॉक लागून युवकाचा मृत्यू

- सुरक्षेची साधने न पुरवल्याने झाला घात
- नातेवाईकांचा ठेकेदारावर आरोप

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर शहरात सेंट्रींगचे काम करताना विजेचा जोराचा धक्का लागून एका युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना वसंत विहार येथे रविवारी सकाळी घडली. बालाजी पांडुरंग वाघमारे (वय २०, रा.सम्राट चौक सोलापूर) असे त्या मृत तरुणाचे नाव आहे. ही घटना घडताच शासकीय रुग्णालय परिसरात मृताच्या नातेवाईकांची एकच गर्दी झाली होती. या घटनेने रुग्णालय आणि सम्राट चौक परिसरात एकच आक्रोश ऐकण्यास मिळाला.

दरम्यान, बालाजी वाघमारे हा वसंत विहार येथे सेंट्रींगचे काम करत असताना त्याला विजेचा जोरदार धक्का बसला, ज्यामुळे तो जागीच कोसळला. त्यास तातडीने सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात


मृत बालाजी वाघमारे

उपचारासाठी दाखल करण्यात आले असता, येथील वैद्यकिय अधिकाऱ्यांनी त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या घटनेनंतर बालाजीच्या नातेवाइकांनी आणि मित्रांनी एकच हंबरडा फोडला. बालाजी याच्या पश्चात त्याची आई, वडील, एक भाऊ आणि तीन बहिणी असा परिवार आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली असून, फौजदार चावडी पोलिस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.


### कुटुंबकर्ता गेला...
बालाजीचे वडील देखील सेंट्रींगचे काम करत होते. काही काळापूर्वी त्यांच्या हातावर शस्त्रक्रिया झाल्याने कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची बनली होती. वडिलांचा वैद्यकीय खर्च आणि कुटुंबाचा आधार व्हावा यासाठी बालाजीने कामाला सुरुवात केली होती. बालाजीच्या मृत्यूमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात शोककळा पसरली आहे.

## आजारास कंटाळून चाकूने मारून घेतले

**सोलापूर :** आजारपणास कंटाळून दीपक पुंडलिक कांबळे (वय ५१ रा.न्यू बुधवार पेठ) याने स्वतः चाकूने हात, पोट आणि गळ्यावर मारून घेतल्याने गंभीरजखमी झाला. ही घटना रविवारी सकाळच्या सुमारास घडली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



शंभरी!

# सिंदखेड गावच्या दुःखावर नृत्यांगनाने घातली फुंकर

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**राज्यातील पूरग्रस्तांकडे कलावंत आणि अभिनेता तसेच अभिनेत्री यांनी पाठ फिरवल्याची ओरड काही दिवसांपूर्वी झाली पण पुण्याच्या एका कलावंतीणने मदतीचे औदार्य दाखवून कला क्षेत्रावरील हा डाग धुवून काढला आहे.ख्यातनाम नृत्यांगना हिंदवी पाटील ह्या प.महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत.दक्षिण सोलापूर तालुक्यातील पूरग्रस्तांना त्यांनी मदतीचा हात दिला आहे.**



लावणीच्या रंगमंचावर आपल्या कलेने, रसिकांची मने जिंकणाऱ्या कलाकार हिंदवी पाटील यांच्या अंतर्मनाला पूरग्रस्तांच्या वेदना भिडल्यानंतर त्या मदतीसाठी बाहेर पडल्या. आपल्या व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून हिंदवी ह्या स्वतः सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त गावोगावी पोहचत असून मुलांच्या डोळ्यात परत चमक यावी म्हणून पुस्तके, वह्या, शालेय साहित्य वाटत आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील सिंदखेड येथे त्यांनी मोठ्या प्रमाणात पूरग्रस्तांना मदत केली. त्यावेळी, चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हसू उमटताच त्यांच्या चेहऱ्यावर समाधान उमटले. त्या एवढ्यावरच थांबल्या नाहीत तर थंडीने थरथरणाऱ्या लहानग्या बाळांना आणि थकलेल्या वृद्धांनाही त्यांनी स्वखर्चातून स्वेटर, ब्लँकेट देऊन मायेची उब दिली, आधार दिला.

सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात गावोगावी फिरत त्यांनी मुलांची विचारपूस केली, त्यांच्या वेदना ऐकल्या आणि हृदयाला भिडणाऱ्या शब्दांत त्यांना नव्या उमेदीने जगायला धीर दिल्याने समाज माध्यमातून त्यांची प्रशंसा होत आहे.

नृत्यांगना गौतमी पाटील हिच्या कारने एका रिक्षावाल्यास धडक दिल्याने गौतमी चर्चेत असतानाच दुसरीकडे पूरग्रस्तांसाठी दुःखाच्या काळोखात लावणीसम्राज्ञी आणि लोकप्रिय नृत्यांगणा हिंदवी पाटील ह्या आशेचा किरण ठरल्याचे पाहायला मिळाले. धाराशिव, सोलापूर, लातूर, बीड, परभणीसह मराठवाड्यात मुसळधार पावसामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले असून बळीराजाचं कुटुंब आर्थिक संकटात सापडले आहे. या आर्थिक संकटात सरकारसह स्वयंसेवी संस्था आणि व्यक्तिगत मदत घेऊन अनेकजण मराठवाड्यातील बांधांवर पोहोचले आहेत. त्यामध्ये, पूरग्रस्तांचे अश्रू पुसण्यासाठी हिंदवी पाटील ह्या आपले योगदान देत आहेत. हिंदवी पाटील यांनी सोलापूर जिल्ह्यातील गावात जाऊन काही वयोवृद्धांसाठी ब्लँकेट वाटप केले, तर चिमुकल्यांच्या शिक्षणासाठी वह्यावाटप करुन हातभार लावला.

### मायेची उब
दरम्यान, हिंदवी पाटील ह्या आज फक्त एक लावणी कलाकार नाही, तर पूरग्रस्तांच्या वेदना ओळखून त्यांना या परिस्थितीतून सावरायला शिकवणारी, आशेचा किरण ठरणारी एक संवेदनशील व्यक्ती म्हणून प्रेरणादायी ठरल्या आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील गावे अजूनही पावसाच्या जखमा सहन करत आहेत, शेती वाहून गेली, घरे उद्ध्वस्त झाली, चिखलात मातीमोलाचे आयुष्य गाडले गेले. पण, या पुराच्या पाण्याचा सर्वाधिक फटका बसला तो निरागस शाळकरी मुलांना, गावखेड्यातील त्यांच्या शाळांना. कोणाचे पुस्तके पाण्यात वाहून गेली, कोणाची शाळेची बॅग चिखलात हरवली, तर कोणाचे कपडेच ओलसर दुःखाने भिजून गेले. तर, काही ठिकाणी शाळाच पाण्यात गेल्याने शाळेचे दफ्तर भिजले आहे. मात्र, या शाळेच्या भिंतीचा ओलावा पाहून अनेकांना माझी शाळा आठवली, त्याच भावनेने या शाळांना, शाळेतील चिमुकल्यांना मदतीचा हात देण्यासाठी अनेकजण पुढे येत आहेत. त्यात, नृत्यांगना हिंदवी पाटील यांचे एक पाऊल पुढे आहे.